# Annexure XXXIX(4)

वृत्तपत्रांच्या व नियतकालिकांच्या जाहिरातीविषयक धोरणात तसेच जाहिरातीच्या दरात सुधारणा करण्यासाठी नेमलेल्या मा. अनिल देशमुख समितीचा अहवाल.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक पीयुबी-१०००/प्र. क्र. ७३/२०००/३४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ७ मे २००२

महसूल व वन विभाग
क्रमांक ........
22 MAY 2002
कार्यालय ....१६४२९
अनुक्रमांक........

वाचा.—(१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीयुबी-१०००/ प्र. क्र. ७३/२०००/३४, दिनांक १ मे २००१.

(२) शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीयुबी-१०००/ प्र. क्र. ७३/२०००/३४, दिनांक ८ ऑगस्ट २००१.

## शासन निर्णय

संदर्भीय एकच्या शासन निर्णयातील नियम ५ ई बाबत संदर्भीय २ च्या दिनांक ८ ऑगस्ट २००१ च्या शुद्धीपत्रकान्वये भूसंपादन व स्थापत्य स्वरूपाच्या जाहिरातींचे वितरण वगळता अन्य सर्व जाहिराती विभागांच्या अभिप्रायानुसार मुख्यालयामार्फत शासनमान्य यादीतील वृत्तपत्रांना वितरित करण्यात येतील असा बदल करण्यात आला होता. परंतु असा बदल केल्यामुळे जाहिरात प्रसिद्ध करण्याच्या प्रक्रियेस लागणाऱ्या विलंबाबाबत विविध शासकीय कार्यालये, पत्रकार संघटना यांच्याकडून आलेल्या तक्रारींचा विचार करून उपरोक्त दिनांक ८ ऑगस्ट २००१ च्या शुद्धीपत्रकातील उक्त नियमात खालीलप्रमाणे बदल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे :—

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. पीयुबी-१०००/प्र. क्र. ७३/२०००/३४, दिनांक १ मे २००१ मधील नियम क्रमांक ५ ई मध्ये नमुद केल्याप्रमाणे स्थापत्य स्वरूपाच्या बांधकामाच्या जाहिरातीबरोबर इतर सर्व प्रकारच्या ब व क वर्ग वृत्तपत्रांना वितरित करावयाच्या जाहिरात वितरणाचे अधिकार मुख्यालयाबरोबरच संबंधित विभागाच्या संचालक (माहिती)/विभागीय माहिती उप संचालक (माहिती) यांनाही राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भूषण गगराणी,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.